Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महिला शेतमजुरांच्या समस्या व उपाययोजना

**कु. अलका मारुती कचरे,** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर लातूर

**प्रस्तावना**

भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. देशातील 70 टक्के लोकसंख्या कृषीवर आधारित व्यवसाय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या असलेले आढळतात. देशाची अर्थव्यवस्था शेतीवर केंद्रित आहे. ही अर्थव्यवस्था चालवण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक घटक राबत असतात त्यात मोठे शेतकरी, लहान घेतकरी, भूमीहीन शेतमजूर स्त्री पुरुष, पांरपरिक कामगार इत्यादी.भारतात शहरीकरणाचा वेग वाढत असताना देखील भारतातील खेडी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहेत. 2011 नुसार भारतात 5.6 लाख खेडी असुन 72. 22 टक्के लोकसंख्या ग्रामिण भागात राहते. कृषी क्षेत्रामध्ये 64 टक्के लोकसंख्या गुंतली असून 58 टक्के व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो अशा भारतीय कृषी अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामिण विभागांमधील आर्थिक व सामाजिक जीवनाचा शेतमजुर हा महत्वाचा घटक आहे. भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणा-या देशात शेतमजुर वर्ग बराच मोठा आहे भारतात अनेक शेतक-यांकडे महिला शेतमजुर काम करताना दिसून येतात. महिला शेतमजुरांमध्ये अज्ञान, निरक्षरता, दारिदय व त्यांचा कर्जबाजारीपणा, ग्रामीण समाजात त्यांना प्राप्त झालेले अत्यंत खालचे स्थान, ताठर समाज व्यवस्था अशा अनेक कारणांमुळे महिला शेतमजुरांना आपली पिळवणुक होत असल्याचे दिसुन येते.

निर्वाहासाठी सहेतुकपणे जमिनीतुन पीके काढणे म्हणजेच कृषी असा अर्थ घेतला तर शेतीचा इतिहास इ.स. पूर्व 8 ते 10 हजार वर्षापेक्षा जुना नाही तत्पुर्वी मानव रानटी अवस्थेत असताना जंगलातील जनावरे, प्राणी यांची शिकार करून त्यावर आपला उदरनिर्वाह करीत असावा असा अंदाज आहे. नंतर कंदमुळे, झाडांची फळे व तृणधान्ये यावर तो आपली उपजिवीका करू लागला. भटक्या टोळया करून एका ठिकाणवरून दुसरीकडे न फिरता स्थिर स्वरूपाच्या वसाहती करून मनुष्य राहु लागल्यावर पिकांचे संवर्धन केले जाऊ लागले. कृत्रीम अवजारांच्या सहाय्याने जमीन नांगरून खतांचा वापर करून शेती केल्यास जास्त उत्पादन घेता येते हे लक्षात आल्यावर तो नवीन पध्दतीने शेती करू लागला व यातुनच शेतीचा शोध लागला. संपूर्ण भारतातील ग्रामीण कृशी क्षेत्राचा आढावा घेतल्यास असे लक्ष्यात येते की लोकसंख्यावाढ, एकत्रीत कौटुंबिक संपत्तीचे विभाजन त्यामुळे जमिनेचे तुकडीकरण होवून शेत मजूरांची संख्या दिवसेंदिवस वाढतांना दिसून येते.शेतीवर राबणाऱ्या मजूरांमध्ये स्त्री क्षेत्र मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पुरूशांच्या बरोबरीने घेतात राबताना महिला मजुर आढळतात.

**शेतमजुर व्याख्या :** शेतमजुरांची अचूक व्याख्या करणे फार अवघड आहे. तरीही काही तज्ञ व्यक्तींनी व अर्थशास्त्रज्ञांनी शेतमजुरांच्या व्याख्या केल्या आहेत.

१. शेतमजुर चौकशी समिती १९५०-५१ मधील पहिल्या शेतमजुर चौकशी समितीने पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे."जे लोक शेतकऱ्यांकडे पीक लागवडीच्या काळामध्ये पैशाच्या मोबदल्यात पीक लागवड करतात त्यांना शेतमजुर म्हणतात."
२. १९५६-५७ मधील दुसऱ्या शेतमजूर चौकशी समितीने पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

शेतीमध्ये काम करणारे शेतमजुर असतातच याशिवाय दुग्ध व्यवसाय, पशूपालन, कुक्कुट पालन इत्यादी पूरक व्यवसाय करणाऱ्या लोकांनाही शेतमजूर म्हणतात.

**महिला मजुराचा अर्थ** : इतरांच्या शेतजमीनीमध्ये कृषीविषयक कामे रोजंदारी तत्त्वावर करण्यासाठी जाणारा मजूर म्हणजे महिला शेतमजूर होय.

ग्रामीण भागात महिला शेतमजुर कोणास म्हणवे याचे काही निकष आहेत

1. वेतमजुर दुसऱ्याच्या शेतजमिनीवर उपजिविकेचे साधन मिळविण्याच्या उदेशाने काम करते.

2. ती तीथे काम करते ती जमीन तिच्या मालकीची नसते.

3 दुस-यांच्या मार्गदर्षनानुसार ती शेतात राबत असते.

4. तिच्या शारीरिक कामाचा मोबदला हा रोख पैशाच्या किंवा धान्याच्या रूपात असतो.

2. महिला शेतमजूर उदरनिर्वाहसाठी कष्ट करते, नफा मिळवण्यासाठी नाही.

**महिला शेत मजुरीचे प्रकार**

**१.भूमीधारी महिला शेतमजूर :** यामध्ये महिला शेतमजुरांजवळ स्वःच्या मालकीची जमीन असते. परंतु जमीन क्षेत्र कमी असते. प्रामुख्याने सीमांत व लहान शेतकऱ्यांचा समावेश भूमीधारी या प्रकारात होतो. भूमीधारी शेतमजुराजवळ जमीन असली तरी; अनेकदा ही जमीन साधनाच्या अभावामुळे लागवडीखाली आणली जात नाही. जमीनीचे क्षेत्र अगदी थोडे असल्यामुळे वर्षातील काही काळ दुसऱ्याच्या शेतात ते काम करतात. अल्पभूधारक महिला शेतमजूरांचा यामध्ये समावेश होतो.

**२. भूमीहीन महिला शेतमजूर :** शेतीवर शेतीकरीता जी विविध प्रकारची कार्ये करावी लागतात. त्याकरीता तिचे श्रम कायमचे किंवा तात्पुरत्या कालावधीसाठी विशिष्ठ मोबदल्याच्या रुपाने विकत घेण्यात येते असे महिला शेतमजूर या प्रकारात येतात. ज्यांना स्वःच्या मालकीची मुळीच जमीन नसून कांही जमीनदरांशी कायमचे बांधले गेले असतात अशा महिला मजुरांचाही समावेश यामध्ये होतो.

**महिला शेतमजूरांच्या समस्या**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे महिला शेतमजुरांना वर्षभर कामाची उपलब्धता नसते. त्यामुळे त्यांच्या वेगवेगळया समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. यामध्ये पुढील समस्यांचा समावेश होतो.

**१. शिक्षणाची समस्या :** ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे स्त्री शेतमजुरांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे. शिक्षणाच्या अभावी स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

**२. दुहेरी भूमिका :** स्त्री शेतमजुरांना घरगुती कामे पूर्ण करून दुसऱ्यांच्या शेतावरती मजुरी करावी लागते तसेच घरातील मुलांची व वृद्ध व्यक्तींची काळजी घ्यावी लागते. या सर्व गोष्टीमुळे स्त्री शेतमजुरांची शारीरिक व मानसिक ओढाताण होत आहे.

**३. दुय्यम सामाजिक दर्जा:** अलीकडील काळात स्त्री व पुरुष समान मानले जात असले तरी ग्रामीण भागात अजून देखील त्या प्रमाणात समानता प्रस्तापित झालेली नाही. एक तर स्त्री शेतमजूर असल्यामुळे त्यांना समाजात आवश्यक त्या प्रमाणात मान मिळत नाही तसेच घरातील पुरुषांकडून देखील काही प्रमाणात वाईट वागणूक दिली जाते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**४. गतिशीलतेचा अभाव:** पुरुष शेतमजूर एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी कामासाठी स्थलांतर करू शकतात मात्र मुलांच्या शाळा, कौटुंबिक जबाबदारी, बाहेरील वातावरण या सर्व गोष्टीमुळे स्त्री शेतमजुरांना स्थलांतर करण्यामध्ये अडचण निर्माण होते.

**५. पुरुषांपेक्षा कमी वेतन:** भारतामध्ये वेतनातील भेदभाव दूर करण्यासाठी सन १९७६ मध्ये समान वेतन कायदा लागू केला आहे. तथापि ग्रामीण भागात या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे ग्रामीण भागात स्त्री-पुरुष समान काम करत असले तरी स्त्री शेतमजुरांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी दिली जाते.

**६. आर्थिक परावलंबी:** स्त्री शेतमजूर शेतीवरती कष्ट करून पैसे कमवतात परंतु सदर पैसे खर्च करण्याचा अधिकार त्यांना असत नाही. स्त्री शेतमजुरांचे आलेले वेतन पती, सासू सासरे अथवा कुटुंब प्रमुखाकडे जमा केले जाते व ते त्याचा विनियोग करतात त्यामुळे स्त्री शेतमजूराला आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलबून रहावे लागते.

**७. पिळवणूक होण्याची शक्यता :**स्त्री शेतमजूर गरीब व कामाची गरज असल्यामुळे अन्यायाविरुद्ध आवज उठवत नाही, जमीनदार व मोठ्या शेतकऱ्यांकडून या गोष्टींचा गैरफायदा घेऊन स्त्री शेतमजुरांची पिळवणूक करण्यात येत आहे.

**८. निकृष्ट राहणीमान व आरोग्य :** मिळालेल्या मजुरीतून स्त्री शेतमजुरांना त्यांच्या जीवनावश्यक गरजा चांगल्या पद्धतीने पूर्ण करणे शक्य होत नाही. राहणीमान निकृष्ट दर्जाचे राहत असल्यामुळे त्याचा स्त्री शेतमजुरांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे.

**९. धार्मिक रूढी परंपरेचा पगडा व बंधने:** भारतातील स्त्री शेतमजुरांमध्ये धार्मिक रूढी परंपरेचा मोठ्या प्रमाणावर पगडा आहे तसेच त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने देखील असल्यामुळे स्त्री शेतमजुरांचे जीवन दु:खमय असल्याचे दिसते. तसेच धार्मिक रुढींचे पालन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येतो.

**१० हंगामी बेरोजागरी :** पुरुष शेतमजुरांना वेगवेगळया कामासाठी मागणी असते परंतु स्त्री शेतमजुरांना लागवड, खुरपणी व काढणी यासाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असते. परंतु हा विशिष्ट कालावधी संपल्या नंतर स्त्री शेतमजुरांना हंगामी बेकारीला तोंड द्यावे लागते.

**११. कामगार योजनांच्या माहितीचा अभाव :** भारतातील महिला शेतमजूर मोठ्या प्रमाणावर अशिक्षित असल्यामुळे त्यांना शेतमजुरांच्या विकासासाठी असलेल्या योजनांची माहित होत नाही त्यामुळे त्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास राहतात.

**१२. खाजगी कर्जाचा बोजा :**स्त्री शेतमजूर आपल्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खाजगी मार्गाने उच्च व्याज दराने कर्ज घेतात त्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे.

महाराष्ट्र राज्यात स्त्री शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे परंतु शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा झालेली नाही. ग्रामीण भागातील महिला घरातील काम, आपल्या जनावरांची व्यवस्था व मुलांची काळजी या सर्व गोष्टी पूर्ण करून शेतमजुरी करत असल्यामुळे त्यांची शारीरिक व मानसिक ओढताण होत असते. तसेच कमी महत्वाचे स्थान, आर्थिक निर्णय घेण्याचे स्वतंत्र नसणे, पुरुषांपेक्षा कमी वेतन, कामाच्या ठिकाणी शारीरिक व मानसिक छळ, पुरुषांचे वर्चस्व या सारख्या आर्थिक व सामाजिक समस्यांना स्त्री शेतमजुरांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी त्या भागातील स्त्री शेतमजुरांचा विकास करणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाने व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे अपेक्षित आहे. स्त्री


Copyright © | JET Network, All Rights Reserved

शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी असलेल्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी, स्त्री शेतमजुरांसाठी नवीन कायदे व योजनांची निर्मिती, सामाजिक व कौटुंबिक स्तरात बदल, स्त्री शेतमजुरांना आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व वेतनातील तफावत दूर करण्याची गरज व्यक्त केली आहे

**महिला शेतमजुरांसाठी सरकारी उपाययोजना**

१. किमान वेतन कायदा १९४८) :सन १९४८ चा किमान वेतनाचा कायदा शेतमजुरांनाही लागू करण्यात आलेला आहे. महिला शेतमजुरांचा किमान वेतन दर निश्चित करण्यास घटक राज्यांना सांगण्यात आले. त्यामुळे वेगवेगळया राज्यातील भिन्न परिस्थितीनुसार किमान वेतनाची पातळी भिन्न-भिन्न आहे. प्रत्यक्ष पाहता या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही त्यामुळे शेतमजुरांच्या समस्या सुटू शकलेल्या नाहीत.

२. रोजगार हमी योजना (१९७२-७३] :प्रत्येक भारतीय नागरिकास रोजगार मिळविण्याचा हक्क अधिकार घटनेने दिलेला आहे. याची प्रत्यक्ष सुरूवात महाराष्ट्र सरकाने १९७२-७३ मध्ये केली. रोजगार हमी योजनेविषयी प्रो. दांडेकरांनी म्हटले आहे की, 'ही योजना नसून विकासाचा नवा मार्ग आहे. या योजनेनूसार महाराष्ट्रातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीस (१८ वर्षावरील) अकुशल शारीरिक काम देण्याची हमी सरकारने घेतली आहे.

३. वेठबिगारीचे निर्मूलन [२ ऑक्टोबर १९७५] :२ऑक्टोबर १६७५ रोजी वेठबिगारी निर्मूलनासंबंधी कायदा संमत करण्यात आला. शेती क्षेत्रातील वेठबिगारी प्रथा बंद करण्याचा निश्चय भारतीय घटनेत व्यक्त करण्यात आला. वीस कलमी कार्यक्रमामुळे वेठबिगारी प्रथेच्या निर्मूलनाला चालना मिळाली. त्यामुळे भारतीय शेती क्षेत्रातील वेठबिगारी प्रथा पूर्णपणे जरी बंद झाली नसली तरी बरेच यश वेठगारी प्रथा बंद करण्यासाठी मिळालेले आहे.

४. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (२ ऑक्टाबर १९८०) मध्ये एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला होता ग्रामीण भागातील कुटुंबांना विशेषतः शोषित वर्गातील कुटुंबांना दारिद्रय रेषेच्या वर घेण्यासाठी व वाजवी जीवनमान टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे हे एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. या अर्थाने हा एक दारिद्रय विरोधी कार्यक्रम आहे.

५. ग्रमीण भूमीहीन रोजगार हमी योजना [१५ ऑगस्ट १९८३] ग्रामीण भागातील भूमीहीन मजुरांना अधिकाधिक रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी १५ ऑगस्ट १६८३ रोजी हा कार्यक्रम सुरू झाला. ग्रामीण भागात टिकाऊ स्वरूपाची मालमत्ता निमार्ण व्हावी ही अपेक्षा आहे. यामधून सहाव्या योजनेत २६२८ लाख श्रमदिवस रोजगार उपलब्ध झाला. सातव्या योजनेत या कार्यक्रमावर २४१२ कोटी रूपये खर्च करण्यात आले व त्यामधून ११५ कोटी श्रम दिवस रोजगार उपलब्ध झाला.

६. जवाहर रोजगार योजना (एप्रिल १९८९) :एप्रिल १९८९ मध्ये जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली. ग्रामीण भागातील बेरोजगार व अर्थ-बेरोगारांना काम उपलब्ध करून देणे हा जवाहर रोजगार योजनेचा मुख्य उद्देश होता. हा उद्देश साध्य करताना ग्रामीण लोकांचे जीननमान सुधारावे व भावी विकासाला पूरक अशी रचना आणि मालमत्ता निर्माण व्हावी असा जवाहर रोजगार योजनेचा प्रयत्न होता.

७. शेतमजुरांचे पुनर्वसन :सरकारने लागवड योग्य केलेली जमीन तसेच शासकीय पडीक जमीन वितरित करतात प्रामुख्याने भूमिहीन शेतमजुरांना प्राधान्य देण्यात आले.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

८. शेतमजुरांच्या सहकारी संस्थाची स्थापना: दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतमजुरांच्या सहकारी संस्था स्थापन केल्या जाण्यास अधिकाधिक प्रोत्साहन दिले जात आहे. रस्ते बांधणी वनारोपण व कालवे तयार करणे वगैरे कामे शेतमजुरांच्या सहकारी संस्थांना मिळावीत यासाठी शेतमजुरांच्या सहकारी संस्थांना अग्रक्रम दिला जातो.

९. इतर उपाय: हातमाग उद्योग हा शेतमजुरांच्या कुटुंबाचा एक महत्त्वाचा जोडधंदा आहे. या उद्योगासाठी पुरेसा कच्चा माल मिळवून देण्याचा आणि हातमागाच्या कापडासाठी सुरक्षित बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जात आहे. शेतमजुरांना सवलतीच्या दराने कर्ज देण्यास सहकारी बैंकांना व व्यापारी बँकांना सांगण्यात आले आहे. लहान शेतकऱ्यांच्या व सीमांत शेतकऱ्यांच्या कर्जविषयक गरजा भागवल्या जाव्यात यासाठी क्षेत्रीय ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या आहेत.

१०. दारिद्ररेशा निमूर्लन : दारिद्ररेशा निमूर्लन करीता शेतीपालन कुकुट पालन, वराह पालन, दुबत्यागाई म्हषीचे वाटप अषी ग्रामीण शेतमजुर महीलांना स्वयं रोजगारासाठी प्रेरीत केले जाते.

११. स्वंय सहायता बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**सारांश**

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्यसरकारांनी शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध कायदे व कार्यक्रम राबविले आहेत. तरीही महिला शेतमजुरांच्या समस्या सुटलेल्या नाहीत भूमीहीन शेतमजुरांना शेतीशिवाय इतर क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. त्यांचे कामाचे तास व वेतन यासारखे प्रश्न सोडवणे गरजेचे आहे.जागतिकीकरणाच्या काळात अत्यंत उपेक्षित, दुर्लक्षीत वंचीत समुह म्हणजे ग्रामीण महिला शेतमजुर होत. ज्याच्याकडे कौषल्य नाही. बारमहि रोजगार नाही, शिक्षण नाही. त्यांच बरोबर पारंपारिक शेतीचा हास आणि जागतीकरणामुळे झालेले तंत्रज्ञानाचे आक्रमण यामुळे देशाला 70 वर्शे पूर्ण होवून या महिलांचे ग्रामीण अर्थ व्यवस्थेत भरीव योगदान असून हा त्यांच्या जिवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, शासकीय योजनाची कडक अमलबजावणी करून त्यांना स्वयंरोजगारांचे प्रषिक्षण देवून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची**

१. देषमुख प्रभाकर, 'भारतीय अर्थषास्त्र' पिपळपूर प्रकाषन नागपूर, 2006, पृ 176
२. पाटील व्ही. के. के सागर पब्ली, 2009, पृ. 276
३. राऊत रविंद्र, युलिवसल रिसर्व ग्रांऊड जुलै, 2008, पृ. 105
४. https://vishwakosh.marathi.go.in
५. https://mr.wikipedia.org


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I


Copyright © | JET Network, All Rights Reserved